खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरूनगर, ता. खेड, जि.पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२० – २१

## स्वातंत्र्यदिन सोहळा : अहवाल

# राजगुरू महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**राजगुरुनगर । वार्ताहर**

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी आत्मनिर्भर भारताच्या घोषणा दिल्या गेल्या. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. व्ही. डी.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध ऑनलाइन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चित्रकला स्पर्धा, सांस्कृतिक विभागाच्या वतीने देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा आणि क्रीडा व इतिहास विभागाच्या वतीने प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मराठी विभागाच्या वतीने ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन करताना एकमेव लोकमान्य, साहित्यिक अण्णा भाऊ साठे, कोरोनाने मला काय शिकवले, ऑनलाईन शिक्षणाची व्यवहार्यता असे विषय देण्यात आले आहेत.

येथील सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्यसैनिक (कै.) मोरेश्वर सुतार यांचे वंशज राजेंद्र सुतार यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. खेड तहसीलदार कार्यालयात प्रांताधिकारी संजय तेली यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. राजगुरुनगर एसटी आगारात आगारव्यवस्थापक रमेश हांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.खेड तालुक्यात कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालय प्रमुखांसह निवडक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहन करण्यात आले.



# राजगुरू महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**राजगुरुनगर (प्रतिनिधी)** : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी आत्मनिर्भर भारताच्या घोषणा दिल्या गेल्या. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध ऑनलाइन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चित्रकला स्पर्धा, सांस्कृतिक विभागाच्या वतीने देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा आणि क्रीडा व इतिहास विभागाच्या वतीने प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मराठी विभागाच्या वतीने ऑनलाईन निबंध स्पर्धे चे आयोजन करताना एकमेव लोकमान्य, साहित्यिक अण्णा भाऊ साठे, कोरोनाने मला काय शिकवले, ऑनलाईन शिक्षणाची व्यवहार्यता असे विषय देण्यात आले आहेत. येथील सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्यसैनिक (कै.) मोरेश्वर सुतार यांचे वंशज राजेंद्र सुतार यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

खेड तहसीलदार कार्यालयात प्रांताधिकारी संजय तेली यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. राजगुरुनगर एसटी आगारात आगारव्यवस्थापक रमेश हांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.खेड तालुक्यात कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालय प्रमुखांसह निवडक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहन करण्यात आले.

लोकमत



कोरोना संसर्ग काळात उत्कृष्ट काम केल्याबद्दल आरोग्य विभागाच्या समुपदेशक अपेक्षा बोरकर यांचा प्रांत संजय तेली व तहसीलदार सुचित्रा आमले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# राजगुरुनगर येथे शासकीय ध्वजारोहण

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खेड तालुक्यात ७४ वा स्वातंत्र्य दिन साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. राजगुरुनगर येथे खेड तहसीलदार कार्यालयात प्रांताधिकारी संजय तेली यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी तहसीलदार सुचित्रा आमले, गटविकास अधिकारी अजय जोशी, वनाधिकारी आशितोष शेंडगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, राजगुरुनगर नगर परिषदेचे मुख्याधिकारी प्रकाश पाटील, सहायक पोलीस निरीक्षक नीलेश बडाख, खेड पंचायत समितीचे सभापती अंकुश राक्षे, उपसभापती ज्योती अरगडे, यांच्यासह शासकीय अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

## विविध ऑनलाइन उपक्रमांचे आयोजन

हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध ऑनलाइन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चित्रकला स्पर्धा, सांस्कृतिक विभागाच्या वतीने देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा आणि क्रीडा व इतिहास विभागाच्या वतीने प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या वाड्यावर झेंडावंदन करण्यात आले. तालुक्यात विविध ग्रामपंचायत कार्यालयात व जिल्हा परिषद शाळेत फिजिकल अंतर ठेवून झेंडावंदन करण्यात आले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Aug 17, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख